# निवेदन

नागपूर विभागाच्या कृषि सेवक पदभरती जाहिरात क्रमांक आस्था/अ-८/कृसेभ/जाहिरात/१८-१९/८५/२०१९, दिनांक ०३.०१.२०१९ नुसार दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी २०१९ रोजी महापरिक्षा द्वारे महाराष्ट्रातील विविध केंद्रावर ऑनलाईन परिक्षा घेण्यात आली होती. त्या परिक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी www.krishi.maharashtra.gov.in या वेबसाईटवर दिनांक २३.०८.२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

तथापि सदर सर्वसाधारण गुणवत्ता यादीमध्ये नांव नसल्याबाबत तसेच गुणांमध्ये तफावत असल्याबाबत काही उमेदवारांनी लेखी तसेच दुरध्वनीवरून या कार्यालयास आक्षेप सादर केले होते. सदर बाब विभागाच्या निदर्शनास आणण्यात आली असता महापरिक्षा कक्षाकडून कृषि सेवक परिक्षेस बसलेल्या उमेदवारांच्या गुणांकण यादीबाबतच्या प्राप्त सुधारित छोटी मुद्रीका (सिडी) च्या आधारे सुधारित सर्वसाधारण अंतरिम गुणवत्ता यादी व निवेदन www.krishi.maharashtra.gov.in या वेबसाईट वर प्रसिद्ध करण्यात आले होते. सदर निवेदनामध्ये उपरोक्त यादीमधील उमेदवारांचे काही आक्षेप असल्यास दिनांक १४.०९.२०१९ पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रांसह विभागीय कृषि सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर या कार्यालयास प्रत्यक्ष किंवा ई-मेलवर अर्ज सादर करण्यास सुचना देण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने प्राप्त आक्षेपांची पुर्तता करून सुधारित अंतिम गुणवत्ता यादी व अंतरिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर यादीबाबत उमेदवारांचे काही आक्षेप असल्यास संबंधित उमेदवारांनी अंतरिम निवड यादी प्रसिद्ध झाल्यापासून दिनांक १४.११.२०१९ पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रांसह विभागीयं कृषि सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर, प्रशासकिय ईमारत क्र. २, ए-विंग, ७ वा माळा, जिल्हा परिषद समोर, सिव्हील लाईन्स नागपूर - ४४०००१ या कार्यालयास प्रत्यक्ष किंवा nagpurestt@gmail.com या ई-मेल वर अर्ज सादर करण्यात यावा. विहित मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

तसेच मर्यादित विभागीय परिक्षेद्वारे कृषि सहाय्यक संवर्गातून कृषि पर्यवेक्षकांची पदे भरल्यानंतर संभाव्य रिक्त होणाऱ्या कृषि सहाय्यक पदांचा विज्ञापित केलेल्या जाहिराती मधील पदांमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. सदर बाब लक्षात घेता, विलंब होण्याची व पदसंख्येत बदल होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने अंतरिम निवड यादीत समावेश झालेल्या उमेदवाराला नियुक्ती बाबत दावा करता येणार नाही. निकाल प्रसिद्ध होण्याचा दिनांकाला अनुसुचित क्षेत्रातील कृषि सहाय्यकांची पदे वगळता अनुसुचित क्षेत्राबाहेरील उपलब्ध असलेली दिनांक ३१.१२.२०१९ पर्यंत रिक्त होणारी संभाव्य पदे विचारात घेतलेली असल्यामुळे, निवडीस पात्र ठरलेल्या उमेदवारांना जशजशी प्रवर्गनिहाय रिक्त पदे उपलब्ध होतील, त्या प्रमाणे नियुक्ती देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. यासाठी आपले लक्ष जाहिरातीतील मुद्दा क्र. २.१ मधील परिच्छेद दोन (पृष्ठ क्र. ३) कडे वेधण्यात येत आहे.

सदर यादी ही अंतरिम निवड यादी असल्याने उपरोक्त नमुद केल्यानुसार उमेदवारांचे काही आक्षेप प्राप्त झाल्यास तसेच समांतर आरक्षणासाठीचे आवश्यक असणारे निकष व सादर केलेल्या अर्जामध्ये मागणी केलेल्या आरक्षणाबाबतच्या सर्व कागदपत्रांच्या तपासणीनंतर सदर यादीमध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने, अंतरिम निवड यादीमध्ये समावेश झालेले उमेदवार हे नियुक्तीसाठी पात्र ठरतीलच असे नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(आर. जे. भोसले)
विभागीय कृषि सहसंचालक
नागपूर विभाग, नागपूर